जा. क्र. / ४२१ /२०२६,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली,
दिनांक : १८/०२/२०२६.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली

निविदा सुचना (Tender Notice)

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली तर्फे दिनांक **०८.०३.२०२६** रोजी ता. देसाईगंज (वडसा), जिल्हा गडचिरोली येथील **तालुका क्रिडा संकुल, देसाईगंज (वडसा) येथिल खुल्या परिसरात** आयोजित महा विधी सेवा शिबिरामध्ये सहभागी होणाऱ्या सुमारे १५०० ते २००० व्यक्तींसाठी **अल्पोपहार पुरवण्यासाठी** इच्छुक संस्था / कॅटरर्सकडून बंद लिफाफ्यात दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

- **दरपत्रक सादर करण्याचा अंतिम दिनांक, वेळ व ठिकाण:**
  २५.०२.२०२६, सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत.
  ठिकाण: जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, गडचिरोली.
- **दरपत्रक उघडण्याचा दिनांक, वेळ व ठिकाण:**
  दिनांक: २६.०२.२०२५ रोजी, सकाळी १०.३० वाजता.
  ठिकाण: जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली कार्यालय.

इच्छुकांनी दरपत्रकांमध्ये अंतर्भुत असणारी माहिती, सविस्तर अटी व शर्ती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली आणि दिवाणी व फौजदारी न्यायालय देसाईगंज (वडसा) या कार्यालयांचे सुचना फलकावर आणि जिल्हा न्यायालय, गडचिरोलीचे संकेतस्थळावर (https://gadchiroli.dcourts.gov.in) पहाव्यात किंवा कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

दिनांक: १८.०२.२०२६
ठिकाण: गडचिरोली

(अं. पुं. खानोरकर)
सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
गडचिरोली.

अल्पोपहार मेनू (Refreshment Menu)साठी दरपत्रक

अ.क्र.	पदार्थांचे नाव	तपशील
१	पोहे	२००० प्लेट
२	कचोरी	प्रति प्लेट १ कचोरी अशा २००० प्लेट
३	जिलेबी	प्रति प्लेट २ जिलेबी अशा २००० प्लेट
४	चहा	२००० कप
५	स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी	२००० लोकांसाठी

अटी व शर्ती

१. इच्छुक सेवा पुरवठादारांनी आपले दरपत्रक एका बंद पाकिटावर **''महा विधी सेवा शिबिर-अल्पोपहार मेनूसाठी दरपत्रक''** असे लिहून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली या कार्यालयात विहित मुदतीत सादर करणे अनिवार्य राहील.

२. पुरवठादारांनी दिलेले दर, हे वस्तू व सेवा कर (GST) आणि इतर सर्व शासकीय करांसह असणे आवश्यक आहे. एकदा निश्चित केलेले दर प्रक्रियेदरम्यान बदलता येणार नाहीत.

३. साहित्याची ने-आण आणि वाहतूकीचा सर्व खर्च पुरवठादाराचा राहील, यासाठी अतिरिक्त मोबदला दिला जाणार नाही.

४. दरपत्रक उघडण्याच्या वेळी इच्छुक पुरवठेदार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतात.

५. दरपत्रक उघडण्याच्या निश्चित केलेल्या वेळी आणि तारखेला जर पुरवठेदार किंवा त्यांचे प्रतिनिधी अनुपस्थित राहील तरीही त्यांच्या अनुपस्थितीत दरपत्रकांचे लिफाफे उघडले जातील. अशा वेळी उघडलेल्या दरांबाबत किंवा प्रक्रियेबाबत पुरवठादाराची कोणतीही तक्रार किंवा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही.

६. सर्व तांत्रीक निकष आणि अटी पूर्ण करणाऱ्या पुरवठादारांपैकी ज्या पुरवठादाराचे दर सर्वात कमी असतील त्या पुरवठादाराची या कामासाठी निवड केली जाईल.

७. दरांची तुलना करताना 'एकूण खर्च' (Grand Total) विचारात घेतला जाईल. प्रत्येक पदार्थाचा वेगवेगळ दर न पाहता, संपूर्ण पॅकेजसाठी जो पुरवठादार सर्वात कमी दर देईल त्याला प्राधान्य दिले जाईल.

८. निवडलेल्या पुरवठादाराला कार्यादेशामध्ये कार्यक्रमाचे नियोजीत वेळेबाबत आगाऊ सुचना दिली जाईल.

९. पदार्थांचा दर्जा उच्च प्रतीचा असावा आणि स्वच्छतेचे सर्व नियम पाळले जावेत. तसेच पाणी हे अत्यंत स्वच्छ व शुद्ध असावे.

१०. पिण्याचे पाणी आणि डिस्पोजेबल प्लेट्स व चमचे पुरवण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

११. अल्पोपहाराचे ठरवून दिलेल्या ४ स्टॉलमध्ये पदार्थ, चहा व पाण्याचे महा विधी सेवा शिबिरामध्ये सहभागी झालेल्या व्यक्तींना वाटप करण्याची आणि त्यासाठी पुर्ण वेळ स्वखर्चाने आवश्यक तितके वाटपी ठेवण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. त्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली कडून वेगळा खर्च दिला जाणार नाही.

१२. शिबिराच्या ठिकाणी ठराविक वेळेत अल्पोपहार पोहोचवणे बंधनकारक राहील.

१३. काम समाधानकारक पूर्ण झाल्यानंतर शासकीय नियमानुसार देयक अदा केले जाईल. आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१४. कार्यक्रमाचे वेळी ऐनवेळी कोणत्याही पदार्थात वाढ (Addition) किंवा कपात (Reduction) करण्याचा अधिकार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोलीकडे राखीव राहील. अशा परिस्थितीत, देयकाची अंतिम रक्कम ही प्रत्यक्ष पुरविलेल्या पदार्थांच्या संख्यानुसार (Actual Quantity) आणि दरपत्रकामध्ये दिलेल्या मुळ दरांनुसार (Unit Rates) कमी किंवा जास्त केली जाईल. पुरवठादाराने केवळ प्रत्यक्ष लागलेल्या प्लेटचेच बिल सादर करणे आनिवार्य राहील.

१५. कोणतीही पुर्वसुचना किंवा कारण न देता प्राप्त झालेले दरपत्रक स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा पुर्ण अधिकार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली कडे राखीव राहील.

दिनांक: १८.०२.२०२६
ठिकाण: गडचिरोली

(अं. पुं. खानोरकर)
सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
गडचिरोली.